# बँक आणि वास्तुशास्त्र

बबनराव पाटील

**बँकांच्या प्रभावी जाहिराती, योजनांमधील वैविध्य, ठेवींवरील वाढते व्याजदर, कर्जावरील घटणारा व्याजदर, अधिकाऱ्यांकरिता राबवले जाणारे नानावीध प्रशिक्षण कार्यक्रम या सर्वांबरोबरच बँकांची रचनासुद्धा वास्तुशास्त्राच्या नियमांना अनुसरून असणे अगत्याचे आहे.**

बँकिंग (Banking Service) ही आजकाल प्रत्येकाची नित्याचीच गरज झाली आहे. पूर्वी बँकांकडे 'व्याज व खात्रीलायक सुरक्षा देणारी पैशांची तिजोरी' या नजरेने पाहिले जाई. परंतु जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे बँकांनी नवे रूप धारण केले. आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर हमखास साथ देणारा साथीदार म्हणून बँकांकडे आपुलकीने पाहिले जाते. बँकांची विविध घोषवाक्येसुद्धा हेच सूचित करतात.

बचतीबरोबरच नवीन घर घ्यायचे असो वा त्याचे फर्निचर करायचे असो; घरामध्ये किमती वस्तू घ्यायच्या असोत वा नवी कार घ्यायची असो, उच्च शिक्षण घ्यायचे असो वा मुलींचे लग्न करायचे असो आपले प्रत्येक स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी बँक आपल्या पाठीशी उभी असते. शेती, लघुउद्योग, व्यवसाय या सर्वांसाठी भांडवल उपलब्ध करून देण्यासाठीही बँका पुढे सरसावल्या आहेत. इतकेच काय, अगदी घरच्यांप्रमाणे वरिष्ठांची विशेष काळजी बँकांनासुद्धा आहे. अशा प्रकारे बँक ही आपल्या सर्वांच्याच जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे.

दिवसेंदिवस बँकिंग सेवा ही अधिकाधिक ग्राहकाभिमुख होत आहे. आजच्या घडीला तर बँकांमध्ये चालू असलेली स्पर्धा पराकोटीला पोहचलेली आहे.

बँकांच्या प्रभावी जाहिराती, योजनांमधील वैविध्य, ठेवींवरील वाढते व्याजदर, कर्जावरील घटणारा व्याजदर, अधिकाऱ्यांकरिता राबवले जाणारे नानावीध प्रशिक्षण कार्यक्रम या सर्वांबरोबरच बँकांची रचनासुद्धा वास्तुशास्त्राच्या नियमांना अनुसरून असणे अगत्याचे आहे.

बँकांमध्ये असलेले विविध पदाधिकारी, त्यांच्या कार्यालयीन जबाबदाऱ्या तसेच ग्राहकवर्ग यांना विचारात घेऊन वास्तुशास्त्रानुसार त्यांना विशिष्ट जागा दिली गेली पाहिजे.

**बँक मॅनेजर**

बँकेचे मुख व्यवस्थापक अर्थात मॅनेजर यांच्यावर बँकेची मुख्य जबाबदारी असते. इतर अधिकारीवर्गावर देखरेख, त्यांचे नेतृत्व, यांबरोबर विविध योजनांची कार्यवाही करणे, निरनिराळी लोन्स पास करणे, इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर मीटिंग्ज्ना उपस्थित राहणे असा महत्त्वाचा कार्यभार व्यवस्थापकाला उचलावा लागतो.

वरील सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्यासाठी वास्तुशास्त्रानुसार मॅनेजरला नैऋत्येची दिशा सरस मानली आहे. त्या अनुषंगाने नेतृत्व, निर्णयक्षमता व धडाडीने काम करण्याचे कौशल्य प्राप्त होईल.

नैऋत्येनंतर आग्नेय दिशेला मॅनेजर केबिनसाठी प्राधान्य दिले जावे.

केबिनमध्येदेखील केबिनच्या नैऋत्य दिशेस खुर्ची व पूर्व किंवा उत्तरेकडे तोंड येईल अशी टेबलखुर्चीची रचना असावी. केबिनचा दरवाजा पूर्व अथवा उत्तरेस असावा. केबिनच्या दरवाजाच्या समोरच टेबलखुर्ची येणार नाही याची काळजी घ्यावी. दक्षिण भिंतीवर खुर्चीच्या मागे डोंगराचे चित्र असावे.

**स्ट्राँग रुम / सेफ रुम अर्थात बँकेच्या मुख्य तिजोरीची रुम**

बँकेमध्ये दोन ठिकाणी कॅशचा साठा असतो. एक म्हणजे बँकेची मुख्य तिजोरी अथवा स्ट्राँग रुम आणि दुसरे म्हणजे कॅशिअरचा ड्रॉव्हर.

आता वास्तुशास्त्राने धनसंचय कोठे करावा याबाबत काय सांगून ठेवलंय ते जरा नीट अभ्यासू.

आता, एकाशितीपद वास्तुपुरुष मंडळाची कल्पना बँकेच्या प्लॉटवर करून प्राचीन ग्रंथकार धनसंचय स्थानाबाबत काय सांगतात ते पहा....

वास्तुशास्त्राचा प्रमाणग्रंथ म्हणून समजल्या जाणाऱ्या 'मयमतम्'मध्ये 'सोमे धनसंचयावासम्।' तसेच 'भूधरे कोषगेहं स्यात्' असे म्हटले आहे.

आकृतीवरून हे स्पष्ट होईल की 'सोम ' हे उत्तरेच्या सीमेवरचा सर्वात मधला कप्पा (पॅद) असून पृथ्वीधर (भूधर) हे सहा पादांनी बनलेले स्थानही सोमपदाला जवळच आहे.

'मानसार'ने सोम पादाबरोबरच मृगपादालाही धनसंचयासाठी पसंती दर्शवली आहे. (सोमे मृगपदे चैव हेमरत्नस्य वासकम्।।)

धनसंचयाकरिता उत्तरेच्या दिशेबाबत आचार्यांचे एकमत असल्याचे दिसून येते. जरा डोकं खाजवलं तर सहजच लक्षात येतं की उत्तर ही साक्षात कुबेराची दिशा. कुबेर हा देवांचा खजिनदार आहे. शिवाय हे लक्ष्मीचे स्थान असून शुभ जैविक ऊर्जेचे उगमस्थान आहे आणि म्हणूनच धनसंचयाचे सर्वात श्रेष्ठ स्थान असणे योग्यच वाटते.

उत्तरेबरोबरच अन्य दिशांचा विचारही पुराणग्रंथांनी केला असून पश्चिमेस 'वरुण' पादात, पूर्वेस 'रवी' पादात म्हणजेच अनुक्रमे पश्चिम व पूर्वेच्या मध्यवर्ती पादांना धनसंचयासाठी मान्यता मिळाली असून वायव्येचा कोपराही धनधान्यसाठ्याकरिता उपयुक्त मानला आहे.

वरील चर्चेवरुन नैऋत्य कोपरा तिजोरी ठेवून जड करणे अथवा दक्षिणेच्या भिंतीलगतच्या उत्तरेला उघडणाऱ्या कपाटात तिजोरी ठेवणे किती चुकीचे आहे हे स्पष्ट होईल. किंबहुना दक्षिण, नैऋत्य, आग्नेय ब्रह्मस्थानाबरोबरच ईशान्येसही धनसंचय निषिद्ध मानला आहे. असो.

**स्ट्राँग रुम** अर्थात बँकेच्या मुख्य तिजोरीकरिता प्रथम प्राधान्य उत्तरेच्या पृथ्वीधर, सोम, मृग पादातच द्यावे. काही कारणास्तव तेथे मुख्य तिजोरी ठेवणे शक्य नसेल तरच इतर पूर्व-पश्चिमादी दिशांचा विचार करावा.

तिजोरीचा दरवाजा मात्र उत्तरेलाच उघडला जाईल याची खबरदारी घ्यावी. त्या अनुषंगाने उत्तरेचा पृथ्वीधर (भूधर) पाद सर्वोत्तम असून सोम, मृग, रवी, वरुण पादांतही उत्तरेला उघडणारी तिजोरी ठेवणे शक्य आहे.

**कॅशिअर केबिन**

स्टाँग रुमनंतर पैशांची देवघेव चालते ती कॅशिअर केबिनमध्ये. स्टाँग रुमची दिशा निश्चित झाल्यानंतर उरलेल्या धनसाठ्यास उपयुक्त पादांमध्ये कॅशिअरचे केबिन चालते. कॅशिअरचे तोंड पूर्व अथवा उत्तरेस व कॅशड्रॉव्हर उत्तरेसच उघडणारी राहतील याची खबरदारी घ्यावी म्हणजे झाले.

**लॉकर्स रुम**

ग्राहकांकरिता असणारी 'लॉकर्स रुम' दक्षिण, नैऋत्य अथवा पश्चिमेस असावी. यामुळे या दिशांना जडत्व येऊन ऋण ऊर्जेचे अशुभ परिणाम बँकेस भोगावे लागणार नाहीत.

दक्षिण, पश्चिम, नैऋत्य कोपरा जुने रेकॉर्डस्, फाइल्स अथवा गोडाऊनच्या योजनेने जड करणे स्वागतार्हच आहे.

अकाऊटंट, कॅश ऑफिसर हे मॅनेजरनंतरचे अधिकारी यांना दक्षिण व पश्चिम दिशेस जागा घ्यावी. पूर्व अथवा उत्तरेस तोंड करून काम करावे. पूर्व तसेच ईशान्य भागातील अकाउंटंटची योजनाही फलदायी ठरली आहे.

**बँकेचा वायव्य कोपरा**

बँकेचा वायव्य कोपरा हा सर्व ग्राहकाभिमुख योजनांकरिताच खास करून ठेवावा. जेणे करून सर्व योजनांना भरभरून प्रतिसाद मिळेल. विविध बचत योजना, कर्ज योजना, क्रेडिट कार्ड सेल, मार्केटिंग डिपार्टमेंट, बचत गट योजना, सोने तारण योजना अशा विविध योजनांची पोस्टर्स, तद्संबंधित कागदपत्रे, फॉर्म्स, बुकलेट्स यांबरोबरच तो कार्यभार सांभाळणारे अधिकारी यांनी वायव्य कोपऱ्यात स्थानापन्न व्हावे. विविध बचत गट अधिकारी, फिल्डवर्क करणारे फिल्ड ऑफिसर्स, ॲग्रीक्लचरल ऑफिसर्स अशांनी वायव्येस स्थानापन्न झाल्यास योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचल्याचे अनुभवास आले आहे.

कँटीन, आग्नेय अथवा पश्चिमेस तर मीटिंग रुम पश्चिमेस असावे. टॉयलेट पश्चिम अथवा वायव्येस चालेल.

अशा प्रकारे योजना केल्यास आपस